**नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका स्थायी समिती नांदेड.**

दिनांक 14.08.2019 रोजी दुपारी 03.00 वाजता नांवामनपा स्थायी समितीची सभा मनपाकेच्या मुख्य कार्यालयाचे प्रशासकिय इमारतीतील पहिल्या माळयावरील समिती सभागृहात मध्ये भरविण्यात आली होती. उपस्थिती नोंदणी रजिस्टर मध्ये स्वाक्षरी करुन सदर सभेस खालील म.न.पा. स्थायी समितीचे सदस्य उपस्थित होते.

**श्री खान फारुख अली इलीयाज खान, सभापती**

**सर्वश्री**

| | |
|---|---|
| अब्दुल शमीम अब्दुल्ला साब | खान म. मसुद अहेमद खान उस्मान खान |
| येवनकर मोहीनी विजय | अ. लतीफ अ. मजीद |
| रावत भानुसिंह गयादिनसिंह | वैशाली मिलिंद देशमुख |
| कल्याणकर ज्योती किशन | सौ. कोकाटे करुणा भीमराव |
| वाघमारे दयानंद नामदेव | यन्नम राजेश लक्ष्मीनारायण |
| अ. रशीद अ. गणी | फारुख हुसेन कासीम पिरान |
| जाधव श्रीनिवास नारायण | |

**सभापती** उपस्थित सर्व स्थायी समितीचे स. सदस्य उपआयुक्त प्रशासन सुधीर इंगोले, श्री विलास भोसीकर, उपआयुक्त, प्रभारी मुख्यलेखा परिक्षक श्रीमती शोभा मुंढे, मुख्यलेखाधिकारी सौ. अश्वीनी नरांजे, कार्यकारी अभियंता श्री गिरीष कदम, कार्यकारी अभियंता श्री सुग्रीव अंधारे, कार्यकारी अभियंता श्री कलीम परवेज, सर्व विभाग प्रमुख, क्षेत्रिय अधिकारी यांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात करण्यात येते.

**अब्दुल शमीम** डॉक्टराचा चार्ज काढून आजच्या आज दुस-यास देण्यात यावा. रस्त्यावर सर्व जनावरे बसुन राहत आहेत.

**भानुसिंह रावत** पावसाळा असल्याने सध्या मुख्य रस्त्यावर जनावरे बसुन राहत आहेत त्यासाठी हा जार्च इतर दुस-या कोणासही दयावा. विदयुतचा जो कंत्राटदार आहे तो लाईटचे मटेरीयल देत नाही त्यामुळे कामे होत नसताना दिसत आहेत.

**उप आयुक्त (विकास)** संबधीत कंत्राटदार मटेरीयल देत नाही अशी तक्रार स. सदस्यांची आहे त्यामुळे कंत्राटदारास नोटीस देण्यात यावी.

**भानुसींह रावत** या कंत्राटदाराकडे साधी सिडी सुध्दा नाही तो काय काम करणार आहे. त्याच्यावर तात्काळ अक्शन घ्यावे.

**फारुख बदवेल** विद्युतच्या कंत्राटदारासोबत माझी चर्चा झाली आहे. तो म्हणतो की आपणास बोलण्याचा अधिकार नाही. असे सदस्यास त्याची वर्डींग आहे म्हणुन त्याचे कंत्राट त्वरीत रदद करुन टाकावे.

**अब्दुल लतीफ** कंत्राटदारास मी रात्री 11.00 वा. लाईट बंद असल्याचे सांगीतले होते. त्याचे कामामध्ये लक्ष दिसुन येत नाही. त्यामुळे त्याचे कंत्राटदारावर कार्यवाही करण्यात यावी.

**उप आयुक्त (विकास)** संबधीत कंत्राटदारास नोटीस देण्यापुर्वी सदर नोटीस उप आयुक्तांना दाखवूनच निर्गमित करावी.

**सभापती** कंत्राटदाराने स.सदस्यांना योग्य पध्दतीने बोलले पाहीजे. कंत्राटदारास कडक नोटीस देण्यात यावी.

**वैशाली देशमुख** माझ्या प्रभागात एक ट्रक चुरी टाकण्यात आली आहे. माझा प्रभाग हा 40 नगराचा आहे आठ दिवसापुर्वी एक गाडी टाकण्यात आली यानंतर कधी टाकणार आहेत याचा प्रशासनाने खुलासा करावा.

**कार्यकारी अभियंता(सांबावि)** कंत्राटदाराची काम करण्याची स्पीड कमी आहे ती स्पीड वाढविण्यासाठी आदेशीत करण्यात येईल.

**राजेश यन्नम** मी मागील आठ दिवसापासुन गिटटी व चुरी टाकण्यासाठी पाठपुरावा करीत आहे परंतू आतापर्यत टाकण्यात आली नाही. ती चुरी कधी टाकणार आहेत याचा खुलासा करावा.

**अब्दुल रशीद** कंत्राटदाराचे पेमेट दिले नाही म्हणुन काम करीत नाही असे आम्हाला समजले आहे, कंत्राटदाराचे पेमेंट किती बाकी आहे याची माहिती देण्यात यावी. शहरात सध्या गणपती येत आहेत त्यांने त्वरीत चुरी टाकली पाहीजे. ड्रेनेजची समस्या आहे सर्वांना हा विषय सांगीतला आहे तरीही तो सोडण्यात येत नाही.

**राजेश यन्नम** उत्तर नांदेडची जेटींगची गाडी मागील दिड महीण्यापासुन बंद आहे ती गाडी केंव्हा दुरुस्त होणार आहे. तसेच नविन लहान गाडया घेतल्या आहेत त्या गाडया सुध्दा बंद आहेत. विवेकनगर या गल्ली मध्ये जावू शकत नाही. व प्रभाग नगरमध्ये ही तीच अवस्था आहे.

**वैशाली देशमुख** रामराव पवार मार्गाचे ड्रेनेज रस्त्यावर वाहत आहे तो प्रश्न केव्हा सोडवणार आहात हे सांगावे.

| | |
|---|---|
| **कार्यकारी अभियंता(ड्रेनेज)** | रामराव पवार मार्गाचे ड्रेनेजचे काम करण्यासाठी निविदा मागविण्यात आली आहे. निविदा अंतिम झाल्यानंतर काम करुन घेण्यात येईल तसेच ड्रेनेजची समस्या आहे मी स्वतः त्या साईटवर जावून काम करुन घेत आहे. आता केवळ आपण 20 लक्षाचे काम करीत आहोत, तसे पाहीले तर ती लाईन बदलण्यासाठी किमान एक कोटी रुपये खर्च अंदाजे अपेक्षीत आहे. |
| **सभापती** | एक जेटींग गाडी बंद आहेत तर तीची दुरुस्ती किती दिवसात होणार याची माहिती दयावी. |
| **उप अभियंता (यांत्रीकी)** | उत्तर नांदेडची जेटींग गाडी ही बंद असुन दुरुस्ती करण्यासाठी तीला आणखी 15 दिवस लागण्याची शक्यता आहे पुण्यावरुन स्पेअर पार्ट मागविण्यात येत आहे. कंपनीच्या सतत संपर्कात असुन पाठपुरावा देखील करण्यात येत आहे. शक्य होईल तेव्हढया लवकर गाडी दुरुस्त करुन घेण्यात येईल. आपल्याकडे आता 6 गाडया चालू आहेत. |
| **राजेश यन्नम** | माझ्या प्रभाग स्वच्छ करण्यासाठी मला आठ दिवस गाडीची आवश्यकता आहे ती देण्याची व्यवस्था करावी. |
| **सभापती** | उत्तर नांदेडसाठी एक गाडी तीन दिवस देण्यात यावी व दक्षिण नांदेडसाठी तीन दिवस देण्यात यावी.जी गाडी ना दुरुस्त आहे, तीचे पार्ट हे विदेशातून आणावे लागत आहे ते पार्ट उप अभियंता त्वरीत मागणी करुन गाडी दुरुस्त करुन घ्यावी. यात विलंब होणार नाही याची काळजी घ्यावी. |
| **फारुख बदवेल** | एजन्सी भारतात असतात. सभागृहास उत्तर हे योग्य पध्दतीने देण्यात येत नाही, कोणतीही कंपनी त्याचे पार्ट हे शोरुमला ठेवत असते. सभागृहाची दिशाभुल करण्यात येत आहे असे मला वाटते. गाडी त्वरीत दुरुस्त करुन दयावी एवढीच आमची मागणी आहे ती पुर्ण करावी. |
| **अ. लतीफ/फारुख बदवले** | श्री अय्युब नांवाचा कर्मचारी आहे त्यास कामाचा लोड जास्त झालेला आहे त्याकरीता त्याच्या मदतीला श्री शादुल्ल हे या पुर्वी या विभागात काम करीत होता त्याला देण्यात यावे. यामुळे कामात सुसुत्रता येईल. |
| **अब्दुल शमीम** | एकटा श्री शादुल्ल आला तर चालणार नाही त्यासोबत 10 लेबर देणे आवश्यक आहे तर कामे होतील अन्यथा कामे होणार नाहीत. |
| **अब्दुल रशीद** | माझ्या प्रभागात ड्रेनेजची समस्या फार मोठी आहे ती सोडण्यात येत नाही. मस्जीदच्या समोरच्या रस्त्यावर ड्रेनेज वाहत आहे ते दुरुस्त करुन दयावे. सफाईच्या कामात आम्हाला बकरी ईदच्या दिवशी काही अडचण निर्माण झालेली नाही श्री गुलाम सादीक, सहाय्यक आयुक्त यांचे मी अभिनदंन करतो. त्यांनी एकही तक्रारी येवू दिली नाही. |
| **कार्यकारी अभियंता(ड्रेनेज)** | प्रभाग 12 मधील ड्रेनेजचे काम जेएनएनयुआरएम व बिएसयुपी या योजने अंतर्गत करण्यात आले आहे. या योजनेत काम केले परंतू ती लाईन मुख्य लाईनला जोडलेली नाही लोकांनी त्या लाईनला कनेक्शन सुध्दा घेतले आहे. ही लाईन जोडण्याचे अंदाजपत्रक तयार करण्यात येत आहे. |
| **भानुसिंह रावत** | यापुर्वीच काम का करुन घेण्यात आले नाही. आता का काम करुन घेण्यात येत आहे यापुर्वीच त्यावर खर्च झालेला आहे. आणखी त्यावर खर्च करणे चुक आहे. हे जोडणीचे काम करण्यासाठी किती रुपये रक्कम लागणार आहे हे सांगावे. |
| **मसुद अहेमद खान** | माझ्या प्रभागात देखील ड्रेनेजची समस्या आहे ती समस्या सुध्दा सोडविण्यात यावी.ती लाईन मिळविली नसेल तर मिळविण्यात यावी. |
| **सभापती** | ड्रेनेज लाईन जोडणीचे काम त्वरीत पुर्ण करण्यासाठी निविदा तात्काळ काढण्यात यावी व काम पुर्ण करुन घ्यावे. हे ड्रेनेजचे काम करण्यासाठी काही मंजूरीची आवश्यकता लागत असेल तर त्यास आजच्या सभेमध्ये मान्यता देण्यात येते. |
| **भानुसिंह रावत** | विष्णुपुरी प्रकल्पात आता पाणी किती आहे, किती दिवस पाणी पुरणार आहे याची माहिती दयावी. |
| **कार्यकारी अभियंता(पापु)** | विष्णुपुरी जलाशयाची माहिती अशी आहे की, आठ जुनला आपण डेड स्टॉकला गेलो होतो. 8 ऑगस्टला आपल्या जलाशयात 5 एमएमक्यु पाणी आले आहे. आज रोजी आपल्याकडे 16.93 एमएमक्यु पाणी आहे. आसना मध्ये आपल्याकडे चार गेट पाणी आहे. सहा दिवसा नंतर आपण शहरात पाणी देत आहोत तर आजच जाहीर प्रकटन देत आहे की, पाच दिवसाला पाणी देणार आहोत. अर्धापावसाळा गेला आहे उर्वरीत दिवसामध्ये पाणी पडले किंवा नाही याची काही शाश्वती नाही. जायकवाडी धरण 95 टक्के भरल्यानंतर पाणी सोडले जाईल परंतू ते पाणी आपल्या पर्यत येईल किंवा नाही यात शंका आहे कारण मध्यंतरी 12 ते 13 बॅरेजेस आहेत त्यामुळे येईल असे नाही. आसना बंधाराची जागा अकवायर करण्याचा विषय आहे मा. आमदार यांनी यावर चर्चा केली आहे. दोन तिन बंधारे बांधुन पाणी साठविण्यात येणार आहे. त्याचेही नियोजन करण्यात येत आहे. |

| | |
|---|---|
| **भानुसिंह रावत** | आपण चांगले काम करीत आहात. जर शेतक-यांनी पाणी उपसा करण्यास सुरुवात केली तर आपले पाणी किती कमी होवू शकते. त्याचा आपल्यावर काय परीनाम होईल. जे पथक आहेत ते पथक काही उपयोगी नाहीत. |
| **वैशाली देशमुख** | अमृत योजनेचे क्रास कनेक्शन मागच्या मिटींग मध्ये विचारणा केली होती ती कैंव्हा होणार आहे हे सांगावे. |
| **कार्यकारी अभियंता(पापु)** | अमृत योजनेचे काम करणा-या कंत्राटदाराचे लेबर कालच आले आहेत. शहरातील एका ठिकाणचे काम पुर्ण झाल्याबरोबर लेबर कॉलनी, गणेश नगर या एरीयातील क्रास कनेक्शन करुन देण्यात येतील. |
| **अ. शमीम अब्दुल्ला** | विषय पत्रिका पास करण्यास मान्यता देण्यात येते. |
| **भानुसिंह रावत** | श्री अ. शमीम यांनी विषय पत्रका पास करण्याचा जो प्रस्ताव मांडला त्यास माझे अनुमोदन आहे. |
| **सभापती** | प्रभाग क्रमांक 6 मधील पाण्याच्या लाईनचे क्रास कनेक्शन येत्या दोन दिवसात कार्यकारी अभियंता यांनी पुर्ण करुन दयावे. |

**विषय क्रं. 01**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेकाक्रं.4/613/2019 दिनांक 12.07.2019 अन्वये भारतीय प्रजासत्ताक दिनांचा 69 वा वर्धापन दिन दिनांक 26 जानेवारी 2019 साजरा करणे बाबत.

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र दि. 14.01.19, 15.01.19, 19.01.19 अल्प मुदतीची निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/क्षेकाक्रं.4/1345/19 21.01.19 जा.क्रं. क्षेकाक्रं.4/1369/19 दिनांक 23.01.19 अन्वये परि.क्रं.5 अन्वये लागणारे खर्चास मान्यता देऊन कार्यारंभ आदेश देणे बाबतच्या आदेशान्वये दिनांक 26.01.19 रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 29वा वर्धापन दिन समारंभ पोलीस मुख्यालय कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे 26 जानेवारी 19 रोजी सकाळी 9.15 वाजता साजरा करणे करिता दोन शामियाने, अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी सोफासेट, टी पॉय व इतर मान्यवरांसाठी पुरेशा खुर्च्याची व्यवस्था तसेच मा. पालकमंत्री महोदयांच्या भाषणासाठी डायसची व्यवस्था करणे बाबत उपआयुक्त प्र. मनपा नांदेड व पोलीस यंत्रणेच्या देखरेखीखाली सदरील व्यवस्था करणेसाठी परि.क्रं. 5 अन्वये कमी दराच्या तिन निविदा प्राप्त झाल्या यामध्ये श्री सहयोग सेवा जुना मोंढा यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रक असल्यामुळे संबंधीतांचे देयक क्रं. 30 दि. 26.01.19 अन्वये उक्त प्रमाणे व्यवस्था करणेकरिता संबंधीतांना आदेश देण्यात आले होते.

मे. सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे देयक क्रं. 30 दि. 26.01.19 अन्वये उक्त प्रमाणे आवश्यकती व्यवस्था करुन केलेल्या कामाच्या खर्चाचे देयक रुपये 1,84,250/- (अक्षरी रुपये एक लक्ष चौ-यांशी हजार दोनशे पन्नास फक्त) चे सदर केलेले आहे सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे नांवे अदाई करण्याकरिता झालेल्या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता अधिनियम 1949 चे कलम 73 क नुसार कार्योत्तर प्रशासकिय व आर्थीक मान्यता सदरील आदेशाव्दारे देण्यात आली त्यास मान्यतेस्तव स्थायी समिती सभेसपुढे सादर.

सदर खर्च सालसन 2019-20 च्या मनपा अंदाजपत्रकातील संबंधीत लेखा शिर्षकातुन करण्यात यावा.

| | |
|---|---|
| **उपआयुक्त** | सदरील प्रस्तावात कार्योत्तर मान्यता देण्याचा उल्लेख करण्यात आलेला असुन तथापि सदरच्या आदेशाची नोंद घेण्यात यावी व तसा ठरावास उल्लेख करण्यात यावा |
| **सभापती** | उपआयुक्त यांनी सुचविल्यानुसार प्रस्तावातील कार्योत्तर मान्यता असा शब्दाचा प्रयोग करण्यात आलेला असुन तो वगळुन नोंद घेण्याची जो विनंती केलेली आहे त्यास मान्यता देण्यात येते |

**ठराव क्रं. 18** **ठराव**

कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/क्षेकाक्रं.4/613/2019 दिनांक 12.07.2019 अन्वये भारतीय प्रजासत्ताक दिनांचा 69 वा वर्धापन दिन दिनांक 26 जानेवारी 2019 साजरा करणे बाबत.

मा. जिल्हाधिकारी नांदेड यांचे पत्र दि. 14.01.19, 15.01.19, 19.01.19 अल्प मुदतीची निविदा सुचना क्रं. नावाशमनपा/क्षेकाक्रं.4/1345/19 21.01.19 जा.क्रं. क्षेकाक्रं.4/1369/19 दिनांक 23.01.19 अन्वये परि.क्रं.5 अन्वये लागणारे खर्चास मान्यता देऊन कार्यारंभ आदेश देणे बाबतच्या आदेशान्वये दिनांक 26.01.19 रोजी भारतीय प्रजासत्ताक दिनाचा 29वा वर्धापन दिन समारंभ पोलीस मुख्यालय कवायत मैदान वजिराबाद नांदेड येथे 26 जानेवारी 19 रोजी सकाळी 9.15 वाजता साजरा करणे करिता दोन शामियाने, अतिमहत्वाच्या व्यक्तीसाठी सोफासेट, टी पॉय व इतर मान्यवरांसाठी पुरेशा खुर्च्याची व्यवस्था तसेच मा. पालकमंत्री महोदयांच्या भाषणासाठी डायसची व्यवस्था करणे बाबत उपआयुक्त प्र. मनपा नांदेड व पोलीस यंत्रणेच्या देखरेखीखाली सदरील व्यवस्था करणेसाठी परि.क्रं. 5 अन्वये कमी दराच्या तिन निविदा प्राप्त झाल्या यामध्ये श्री सहयोग सेवा जुना मोंढा यांचे सर्वात कमी दराचे दरपत्रक असल्यामुळे संबंधीतांचे देयक क्रं. 30 दि. 26.01.19 अन्वये उक्त प्रमाणे व्यवस्था करणेकरिता संबंधीतांना आदेश देण्यात आले होते.

मे. सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे देयक क्रं. 30 दि. 26.01.19 अन्वये उक्त प्रमाणे आवश्यकती व्यवस्था करुन केलेल्या कामाच्या खर्चाचे देयक रुपये 1,84,250/- (अक्षरी रुपये एक लक्ष चौ-यांशी हजार दोनशे पन्नास फक्त) चे सदर केलेले

आहे सदरचे देयक श्री सहयोग सेवा जुना मोंढा नांदेड यांचे नांवे अदाई करण्याकरिता झालेल्या खर्चास प्रशासकिय व आर्थीक मान्यता अधिनियम 1949 चे कलम 73 क अन्वये हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते नोंद घेते.

**विषय क्रं. 02**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. 19 मध्ये श्री थोरात ते उमरजकर यांचे घर ते आंबेडकरवादी मिशन पर्यंत तसेच लातुर मुख्य रस्ता आर.सी.सी. नाली करणे व श्री बि. सी. कांबळे ते श्री दरबारे यांचे ते वाघमारे यांचे घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी** अंदाजीत किमंत रुपये 28,00,000/- करिता निविदा मागविण्यात येवुन पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांनी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/14325 /2019 दिनांक 05.01.2019 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

परंतु सदर ठिकाणी रस्ता कच्या स्वरुपाचा असुन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम अद्याप करण्यात आले नसल्यामुहे सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे अत्यंत आवश्यक आहे.

करिता नव्याने ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी लागणा-या वाढीव खर्चास रुपये 3,97,600/- यास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी व सदर काम पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यासाठी प्रस्ताव स्थायी समिती सभेसमोर सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या प्रभाग क्रं. 19 मध्ये नव्याने ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी लागणा-या वाढीव खर्चास प्रस्तावास हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 19** **ठराव**

साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी वस्ती सुधारणा योजने अंतर्गत नावाशमनपा हद्दीत **प्रभाग क्रं. 19 मध्ये श्री थोरात ते उमरजकर यांचे घर ते आंबेडकरवादी मिशन पर्यंत तसेच लातुर मुख्य रस्ता आर.सी.सी. नाली करणे व श्री बि. सी. कांबळे ते श्री दरबारे यांचे ते वाघमारे यांचे घरा पर्यंत सी.सी. रस्ता करणेसाठी** अंदाजीत किमंत रुपये 28,00,000/- करिता निविदा मागविण्यात येवुन पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांनी कार्यालयीन आदेश क्रं. नावाशमनपा/साबांवि/14325 /2019 दिनांक 05.01.2019 अन्वये कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

परंतु सदर ठिकाणी रस्ता कच्या स्वरुपाचा असुन ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम अद्याप करण्यात आले नसल्यामुहे सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन टाकणे अत्यंत आवश्यक आहे.

करिता नव्याने ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी लागणा-या वाढीव खर्चास रुपये 3,97,600/- यास प्रशासकिय व आर्थीक मंजुरीसाठी व सदर काम पठाण मोईज अहेमद खान कंत्राटदार नांदेड यांचेकडून करुन घेण्यासाठी हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**विषय क्रं. 03**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील दक्षिण बाजुचे वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी प्रती वर्ष 10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे रुपये 7,12,250/- एवढी सरकारी बोली ठेवुन दिनांक 26.06.19 रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर ई-लिलाव सुचना देण्यात आली व दिनांक 09.07.2019 रोजी ई-लिलाव घेण्यात आला सदर ई.लिलावामध्ये खालील ठेकेदारानी भाग घेता.

| अ.क्र. | लिलावधारकांचे नांव | बोली रक्कम |
|---|---|---|
| 01 | श्री मो. खालेद मो. इस्माईल | 7,19,750/- |
| 02 | श्री प्रल्हाद किशनराव रनविर | 7,17,250/- |
| 03 | श्री शेख मोहसीन शेख हबीब | 7,14,750/- |

वरील पैकी श्री मो. खालेद मो. इस्माईल यांची सर्वात जास्त बोली रुपये 7,19,750/- एवढी आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थीक हिताचा विचार करता सदर मक्ता देण्याबाबत प्रस्ताव स्थायी समितीच्या सभेसमोर निर्णयास्तव सादर,

**सभापती** प्रशासनाने सादर केलेल्या मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील वाहतळाचा मक्ताचा सर्वात जास्त बोली बोलणा-याच्या मक्ता देण्यास मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 20** **ठराव**

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका हद्दीमध्ये मध्यवर्ती बस स्थानका समोरील उड्डान पुलाखालील दक्षिण बाजुचे वाहनतळाचा मक्ता तीन वर्षासाठी प्रती वर्ष 10 टक्के नैसर्गिक वाढ या प्रमाणे रुपये 7,12,250/- एवढी सरकारी बोली ठेवुन दिनांक 26.06.19 रोजी वृत्तपत्रामध्ये जाहीर ई-लिलाव सुचना देण्यात आली व दिनांक 09.07.2019 रोजी ई-लिलाव घेण्यात आला सदर ई.लिलावामध्ये खालील ठेकेदारानी भाग घेता.

| अ.क्र. | लिलावधारकांचे नांव | बोली रक्कम |
|---|---|---|
| 01 | श्री मो. खालेद मो. इस्माईल | 7,19,750/- |

| | | |
|---|---|---|
| 02 | श्री प्रल्हाद किशनराव रनविर | 7,17,250/- |
| 03 | श्री शेख मोहसीन शेख हबीब | 7,14,750/- |

वरील पैकी श्री मो. खालेद मो. इस्माईल यांची सर्वात जास्त बोली रुपये 7,19,750/- एवढी आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या आर्थीक हिताचा विचार करता सदर मक्ता देण्यास ही मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मान्यता देते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो,

**विषय क्रं. 04**

निविदा सुचना क्रं. 17847 दिनांक 08.03.2019 व्दारे दैनिक पुण्यनगरी विभागीय पातळी आणि दै. श्रमिक एकजुट व दै. गाववाला या वृत्तपत्रा मध्ये निविदा सुचना प्रसिध्द करुन बिएसयुपी योजना प्रकल्प 11 अंतर्गत ब्रम्हपुरी येथील शिल्लक मुलभुत सुविधांची कामे करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

उक्त निविदा सुचनेच्या अनुषंगाने खालील तीन कंत्राटदारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदेत नमुद केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | कामारिकर कन्सट्रक्शन | 30% जास्त | L1 |
| 02 | जी. जे. कन्सट्रक्शन | 35.12% जास्त | L2 |
| 03 | पठाण मोईज | 36.33% जास्त | L3 |

बिएसयुपी योजनेच्या प्रकल्प 11 अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील शिल्लक मुलभुत सुविधांचे कामासाठी **कामारिकर कन्सट्रक्शन हे** L1 निविदाधारक ठरल्यामुळे व त्यांनी निविदेत अंदाजपत्रक दरापेक्षा 30% जास्त दर नमुद केल्यामुळे सदर दर जास्तीचे असल्याने संबंधीतांना कार्यालयीन पत्र क्रं. बिएसयुपी/3019/19 दिनांक 01.07.2019 च्या अन्वये दिनांक 02.07.2019 रोजी सकाळी 11.00 वाजता दर कमी करण्यासाठी या कार्यालयात पाचारण करण्यात आले असता दर कमी करण्याच्या झालेल्या चर्चेनुसार संबंधीतांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने काम करण्याचे मान्य करुन लेखी पत्राने कळविले आहे.

करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 क व ड अन्वये कामारिकर कन्सट्रक्शन यांची बिएसयुपी अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील उर्वरीत मुलभुत सुविधांचे कामे करण्यासाठी रुपये 2,20,12,961/- रक्कमेची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव मनपा स्थायी समिती सभेसमोर प्रशासकिय व आर्थीक मान्यतेस्तव सादर.

**सभापती** प्रशासनाने सादर केलेली निविदा मंजुरीचा प्रस्ताव मंजुर करण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**ठराव क्रं. 21** **ठराव**

निविदा सुचना क्रं. 17847 दिनांक 08.03.2019 व्दारे दैनिक पुण्यनगरी विभागीय पातळी आणि दै. श्रमिक एकजुट व दै. गाववाला या वृत्तपत्रा मध्ये निविदा सुचना प्रसिध्द करुन बिएसयुपी योजना प्रकल्प 11 अंतर्गत ब्रम्हपुरी येथील शिल्लक मुलभुत सुविधांची कामे करण्यासाठी निविदा मागविण्यात आल्या होत्या.

उक्त निविदा सुचनेच्या अनुषंगाने खालील तीन कंत्राटदारांच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | निविदेत नमुद केलेला दर | शेरा |
|---|---|---|---|
| 01 | कामारिकर कन्सट्रक्शन | 30% जास्त | L1 |
| 02 | जी. जे. कन्सट्रक्शन | 35.12% जास्त | L2 |
| 03 | पठाण मोईज | 36.33% जास्त | L3 |

बिएसयुपी योजनेच्या प्रकल्प 11 अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील शिल्लक मुलभुत सुविधांचे कामासाठी **कामारिकर कन्सट्रक्शन हे** L1 निविदाधारक ठरल्यामुळे व त्यांनी निविदेत अंदाजपत्रक दरापेक्षा 30% जास्त दर नमुद केल्यामुळे सदर दर जास्तीचे असल्याने संबंधीतांना कार्यालयीन पत्र क्रं. बिएसयुपी/3019/19 दिनांक 01.07.2019 च्या अन्वये दिनांक 02.07.2019 रोजी सकाळी 11.00 वाजता दर कमी करण्यासाठी या कार्यालयात पाचारण करण्यात आले असता दर कमी करण्याच्या झालेल्या चर्चेनुसार संबंधीतांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा 5% जास्त दराने काम करण्याचे मान्य करुन लेखी पत्राने कळविले आहे.

करिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 क व ड अन्वये कामारिकर कन्सट्रक्शन यांची बिएसयुपी अंतर्गत ब्रम्हपुरी भागातील उर्वरीत मुलभुत सुविधांचे कामे करण्यासाठी रुपये 2,20,12,961/- रक्कमेची निविदा हि मनपा स्थायी समितीची सभा सर्वानुमते मंजुर करते व प्रशासकिय व आर्थीक मान्यता देण्यात येते व हा ठराव याच सभेत कायम करण्यात येतो.

**सभापती** आजच्या सभेचे कामकाज संपल्यामुळे आजची सभा संपल्याचे जाहिर करण्यात येते.

**स्वाक्षरीत/-**
**(स. अजीतपालसिंघ संधु)**
**नगरसचिव,**
नांवाशमनपा, नांदेड.

**स्वाक्षरीत/-**
**(खान फारुख अली इलीयाज खान)**
**सभापती,**
**स्थायी समिती,** नांवाशमनपा, नांदेड.